महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : १५६ वा दिनांक : १८/०३/२०२५ वार : मंगळवार

## अजित पवारांच्या नावाने धनंजय मुंढेकडेच बीडचे पालकत्व : तृप्ती देसाई यांचा आरोप

**बीड :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने धनंजय मुंडे हेच बीडचे पालकत्व सांभाळत असल्याचा संशय सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी व्यक्त केला आहे. बीडमध्ये दररोज एकाहून एक भयंकर घटना उजेडात येत आहेत. पण अजित पवार कुठेच दिसत नाहीत. ते त्यावर काही बोलतही नाहीत. त्यामुळे अजित पवार पालकमंत्रिपद चालवत आहेत की, त्यांच्या नावाने धनंजय मुंडे हेच कारभार पाहत आहेत हे कळत नाही, असे त्या म्हणाल्यात.

तृप्ती देसाई यांनी काही दिवसांपूर्वी बीडच्या अनेक पोलिस अधिकाऱ्यांचे संतोष देशमुख हत्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या वाल्मीक कराडशी हितसंबंध असल्याचा आरोप केला होता. त्यांच्या या आरोपांनंतर बीड पोलिस दलात एकच खळबळ माजली होती. त्यानंतर बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या निर्देशांनुसार, पोलिसांनी तृप्ती देसाई यांना आपल्या आरोपाचे पुरावे सादर करण्यासाठी नोटीस बजावली होती. त्यानुसार तृप्ती देसाई यांनी सोमवारी बीड दौऱ्यावर जाऊन पोलिसांना आपल्या आरोपांची पुष्टी करणाऱ्या पुराव्यांचा पेनड्राईव्ह सुपूर्द केला.

यासंबंधीच्या माहितीनुसार, तृप्ती देसाई सोमवारी सकाळी 11.30 वा. बीड पोलिस अधीक्षक कार्यालयात हजर झाल्या. त्यानंतर बीडचे अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांनी त्यांचा जबाब नोंदवला. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना तृप्ती देसाई म्हणाल्या की, मी 26 पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधातील पुरावे पोलिसांना दिलेत. त्यांनी माझा जबाबही घेतला. मी माझे सर्व पुरावे पेन ड्राईव्हच्या माध्यमातून दिलेत. आता पोलिसांनी चौकशी करून दोषी अधिकारी कर्मचाऱ्यांना लवकरात लवकर जिल्ह्याबाहेर पाठवावे. यापैकी अनेक पोलिस कर्मचारी गत अनेक वर्षांपासून एकाच पोलिस ठाण्यात कार्यरत आहेत.

तृप्ती देसाईंनी यावेळी धनंजय मुंडे हेच अजित पवारांच्या नावाने बीडचे पालकमंत्रिपद सांभाळत असल्याचाही आरोप केला. त्या म्हणाल्या, आजही बीड पोलिस दलातील अनेक अधिकारी वाल्मीक कराडला पाठिशी घालण्याचा प्रयत्न करत आहेत. कारण, येथील पालकमंत्रिपद आजही राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे. अजित पवार तर कुठे दिसत नाहीत. ते दरवेळी आपण खूप चांगल्या पद्धतीने काम करतो असा दावा करतात. पण त्यानंतरही बीडमध्ये दररोज भयंकर घटना घडत असल्याचे उजेडात येत आहे. दादा त्यावर काहीच बोलत नाहीत. त्यामुळे अजित पवार पालकमंत्रिपद चालवत आहेत की त्यांच्या नावाने धनंजय मुंडे हेच कारभार पाहत आहेत हे कळत नाही.

ज्या पद्धतीने आष्टीची घटना पुढे आली, खोक्या भोसलेची घटना पुढे आली, नागरगोजे नामक शिक्षकाची घटना घडली आहे. मग पालकमंत्री काय करत आहेत? पालकमंत्री बदलून काही फरक पडला आहे का? जर झाला नसेल, तर गुंडाराज थांबवता येत नसेल तर अधिवेशनातच या प्रकरणी योग्य तो निर्णय घेण्याची गरज आहे. पण तसा निर्णय घेताना कुणीही दिसत नाही. बीडला खरेच गुन्हेगारीमुक्त करायचे असेल, तर गुंडांना पाठिशी घालणारे, त्यांना आश्रय देणाऱ्या पोलिसांना जिल्ह्याबाहेर पाठवावे लागेल. धनंजय मुंडेंचा राजीनामा तातडीने झाला नाही. शेवटी काही पुरावे आल्यानंतर तो घ्यावा लागला. आम्ही सादर केलेले पुरावे अत्यंत अचूक आहेत. त्यामुळे दोषी अधिकाऱ्यांवर तत्काळ कारवाई झाली पाहिजे, असे तृप्ती देसाई म्हणाल्या.

## तेलंगणामध्ये इतर मागास प्रवर्गाचे आरक्षण २३% वरून ४२% पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव



**हैद्राबाद :** तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी सोमवारी विधानसभेत घोषणा केली की त्यांचे सरकार राज्यातील ओबीसी (इतर मागासवर्गीय) आरक्षण मर्यादा २३% वरून ४२% पर्यंत वाढवणार आहे.

जर ते लागू झाले तर राज्यात आरक्षण मर्यादा ६२% पर्यंत वाढेल. हे सर्वोच्च न्यायालयाने ठरवलेल्या ५०% आरक्षण मर्यादेचे उल्लंघन करेल.

२०२३ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेसने ओबीसी कोटा वाढवण्याचे आश्वासन दिले होते.

तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत सांगितले- काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आश्वासन दिले होते की जर काँग्रेस सत्तेत आली, तर ओबीसी आरक्षण ४२ टक्के केले जाईल. सत्ता हाती घेतल्यानंतर लगेचच आमच्या सरकारने जातीय जनगणना सुरू केली. यापूर्वी काँग्रेस सरकारने ओबीसी आरक्षण ३७ टक्के करण्यासाठी राज्यपालांना प्रस्ताव पाठवला होता. हे सरकार पूर्वीचा प्रस्ताव मागे घेत आहे आणि आता ४२ टक्के आरक्षणाचा नवीन प्रस्ताव पाठवत आहे.

ओबीसी आरक्षण ४२ टक्क्यांपर्यंत वाढवण्यासाठी आम्ही आवश्यक कायदेशीर मदत देखील घेऊ. मागासवर्गीयांना ४२ टक्के आरक्षण मिळेपर्यंत आम्ही शांत बसणार नाही.

११७ जागांच्या तेलंगणा विधानसभेत काँग्रेसचे ६४ आमदार आहेत. त्यामुळे, ओबीसी आरक्षण विधेयक विधानसभेत मंजूर होईल, परंतु ते लागू झाल्यानंतर, तेलंगणात आरक्षण मर्यादा 62% पर्यंत पोहोचेल. हे सर्वोच्च न्यायालयाने ठरवलेल्या ५०% आरक्षण मर्यादेचे उल्लंघन करेल.

•आरक्षण लागू करण्यासाठी, संविधानात दुरुस्ती आणि केंद्र सरकारची मान्यता आवश्यक असेल. अशा परिस्थितीत हे विधेयक लागू होईल की नाही, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

•जर भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारने तेलंगणा सरकारच्या आरक्षण लागू करण्याच्या निर्णयाला विरोध केला, तर काँग्रेस या मुद्द्यावरून मोदी सरकारवर हल्ला करू शकते.

## वक्फ बोर्ड जमिनींसाठी पुण्यात मुस्लिम संघटनांचे आंदोलन




**पुणे :** दिल्लीमध्ये दहा मार्चपासून संसदेचे कामकाज सुरू असून सध्या हा दुसरा आठवडा आहे. या आठवड्यात केव्हाही वक्फ संशोधन बिल मोदी सरकारच्या माध्यमातून राज्यसभेत सादर केला जाईल.

वक्फ संशोधन बिल विरोधात दिल्ली येथे जंतर-मंतर या ठिकाणी ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डच्या वतीने प्रचंड आंदोलन होत आहे. सोमवारी मूलनिवासी मुस्लिम मंच व कुल जमाती तंजीम, महाराष्ट्र मुस्लिम फ्रंट, भीम छावा संघटना, तेहरिक अवकाफ ट्रस्ट, राष्ट्रीय ईसाई महासंघ, अॅक्शन कमिटी, संघटनांच्या पुढाकाराने पुणे जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी शैलेंद्र मोरे, संजय भिमाले, रिपब्लिकन संघर्ष. सलीम मुल्ला, इब्राहिम यवतमाळ वाला, मुशताक काझी, सलीम मौला पटेल इत्यादी आंदोलनात सामील होते.

यांप्रसंगी मुख्य संयोजक अंजुम इनामदार यांनी सांगितले की, मोदी सरकारची मुस्लिमांच्या वक्फ बोर्डच्या जमिनीवर वाईट नजर आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये पूर्णपणे मुस्लिम समाजाला नेस्तनाबूत करण्याचा डाव या सरकारचा दिसून येतो. २०१४ पासून मोदी सरकार आल्यानंतर वेगवेगळ्या विधेयक आणून व नवीन कायदे बनवून मुस्लिमांना छळण्याचा काम सुरू आहे.

तथाकथित लव जिहादच्या नावाखाली असो किंवा लँड जिहाद असो किंवा बुलडोझरची राजनीती असो संपूर्ण भारतामध्ये मुस्लिमांना टार्गेट करण्याचा काम सरकारचा सुरू आहे. वक्फ बोर्ड जमिनीबाबत सरकारने चुकीचे धोरण घेतल्यास मुस्लिम समाज कदापि सहन करणार नाही. आमच्या पूर्वजांनी जमिनी समाजासाठी दान देत असताना चांगला हेतू त्यांच्या डोळ्यासमोर होता. या जमिनीतून समाजाची उन्नती व्हावी, विधवा महिलांसाठी, बेरोजगार, तरुणांसाठी, शिक्षणासाठी इत्यादी समाजाच्या भल्यासाठी दिलेली ही जागा आहे.

अल्लाहच्या नावाने दिलेल्या जागेचा कोणीही सौदा करू शकत नाही व कुणीही या जमिनीला लाटू शकत नाही हे मोदी सरकारने लक्षात ठेवावा. संपूर्ण देशांमध्ये याचा उठाव झाल्याशिवाय राहणार नाही. याबाबत समाजामध्ये जनजागृती करण्याचा काम मूलनिवासी मुस्लिम मंचाचे वतीने करण्यात येईल व तसेच पवित्र रमजान महिना संपल्यानंतर पुण्यामध्ये एक मोठा आंदोलन आयोजित करण्यात येईल असा इशारा इनामदार यांनी दिला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १८ मार्च २०२५


## नागरिकांना जलद व योग्य न्याय मिळवून देण्याची जबाबदारी वकिल व न्यायमूर्तींची - न्या. रविंद्र घुगे



**पैठण (नंदु चव्हाण) :** नागरिकांना व पक्षकारांना जलद व योग्य न्याय मिळवून देण्याची जबाबदारी वकिल व न्यायमूर्तींची असून यासाठी वकिलांनी पक्षकारांची बाजु उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयांनी दिलेल्या न्याय निवाड्याचे संदर्भ देऊन अभ्यासपूर्वक व कमी युक्तीवाद करुन लवकरात लवकर न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावे असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रविंद्र घुगे यांनी केले. पैठण येथे नव्याने स्थापन झालेल्या जिल्हा व सत्र न्यायालयाचे उदघाटन न्या. रविंद्र घुगे यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. यावेळी न्यायमूर्ती संजय देशमुख, न्या. विभा प्रभाकरराव इंगळे, न्या. यनशिवराज गोपीचंद खोब्रागडे, पैठणचे नवनियुक्त जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश राजेश्वर गाडवे, महाराष्ट्र गोवा कौन्सिल बारचे अध्यक्ष वसंतराव सोळुंके, खासदार संदिपान भुमरे, आमदार विलास भुमरे, माजी आमदार संजय वाघचौरे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलतांना न्या. घुगे म्हणाले की, पैठणच्या ऐतिहासिक व संतभुमीत जिल्हा व सत्र न्यायालयाची स्थापना होत असून यामुळे नागरिकांना कमी वेळेत जलद न्याय मिळण्यास मदत होणार असून न्यायासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी हेलपाटे टळणार आहे. नविन न्यायालयातून सामान्य नागरिकांना योग्य न्याय मिळावा यासाठी वकीलांनी खटला चालवितांना अभ्यास पुर्ण मांडणी करुन कमी युक्तीवाद करीत लवकरात लवकर योग्य न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन केले. यावेळी न्या. संजय देशमुख, न्या. यनशिवराज खोब्रागडे, न्या. विभा प्रभाकरराव इंगळे यांचेही भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वकील संघाचे अध्यक्ष अॅड संदीप जाधव यांनी केले. कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे सोमनाथ परदेशी,राजु गायकवाड, सा.बां. चे उप अभियंता राजेंद्र बोरकर, तुषार पाटील, प्रशांत जगदाळे, बाळासाहेब माने किशोर चौधरी, शहादेव लोहारे, आबासाहेब गिरगे, राजु मापारी, वकील संघाचे सचिव अॅड, सुभाष खडसन, ज्येष्ठ विधिज्ञ अॅड अशोक शेवतेकर, अॅड,अनिल जोशी, प्रितम साबु, अॅड शेख शकील बागवान, अॅड. वैभव चव्हाण, अॅड, इम्रान याकुब शेख, अॅड, स्वप्निल उगले, अॅड, संदीप नाडे, अॅड, रमेश गव्हाणे, अॅड,आस्मा महेबूब खानापुरे, अॅड,राजेंद्र गोर्डे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

## मुलीनी बौद्धिक आणि मानसिक परिपक्वता प्राप्त करावी - डॉ संजय अस्वले




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** आजच्या मुलीनी एक चांगली बहीण, कन्या, अत्या, आई, सासू बनण्यासाठी बौद्धिक आणि मानसिक परिपक्वता प्राप्त करावी. द्वेष आणि लोभ यापासून दूर राहावे. कि ज्यामुळे नातीगोती जपली जातील आणि कुटुंब व्यवस्था मजबूत होईल. यालाच महिला सबलीकरण म्हणावं असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ संजय अस्वले यानी केले.येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय वाणिज्य विभागातील वाणिज्य मंडळाच्या महिला सबलीकरण मुलीच्या कक्षा अंतर्गत जागतिक महिला दिन सप्ताह समारोपात "मुलींची महिला सबलीकरणसाठी भूमिका" या विषयावर चर्चा सत्राच्या अध्यक्षीय समारोपात डॉ अस्वले बोलत होते. यावेळी महिला सबलीकरण या विषयावर मार्गदर्शन करताना आजच्या काळात खरच महिला अबला आहेत की सबला या प्रश्नावर आपण चर्चा केली पाहिजे. महिला म्हणुन जीवनाच्या प्रवासात अनंत अडचणी येतात. पण त्या अडचणीवर कशी मात करता येईल यासाठी मुलीनी अभ्यास आणि निरीक्षण करावे असे प्रतिपादन प्रमुख मार्गदर्शक अॅड. शुभदा पोतदार यानी केले. पुढे बोलताना अॅड पोतदार यानी विद्यार्थिनींना कसे वागावे, आणि आपल्या संरक्षण साठी असलेले विविध कायदे यावर सविस्तर मार्गदर्शन केले.यावेळी योगिता इंगळे, विशाखा शेळके या विद्यार्थिनीनी आपली मनोगते मांडली. त्यानंतर खुल्या चर्चा सत्रात हुंडा, अत्याचार, न्यायालयीन विलंब, राजकीय हस्तक्षेप अशा अनिष्ट प्रथा आणि चालीरीती याबद्दल विद्यार्थिनीनी प्रश्न मांडले. त्याला या चर्चासत्रात मान्यवरांनी उत्तर दिले.

या कार्यक्रमात सई भोसले या विद्यार्थिनीने दांड पट्टा आणि तलवार बाजी चे सादरीकरण केले. यावेळी डॉ अजित अष्टे, विजयकुमार मुळे, खंडू मुरलीकर , ओमप्रकाश पवार, अक्षता बिरादार, राणी बेंबळगे, यांची उपस्थिती होती या कार्यक्रमाचे सूत्र संचालन अनिता मोरे, प्रास्ताविक श्रेजल पाटील आणि आभार मंजुषा बिराजदार यानी केले.कार्यक्रमासाठी वाणिज्य मंडळाच्या महिला सबलीकरण समितीच्या सदस्यांनी पुढाकार घेतला.

## संविधान अमृत महोत्सवी सोहळा स्वागताध्यक्षपदी कवयित्री उषाताई घायतडक यांची निवड



**छत्रपती संभाजीनगर :** निर्भीड व उत्तुंग विचारांचे मराठी साहित्यिकांचे विचारपीठ साप्ताहिक झेपच्या वतीने घेण्यात येणा-या संविधान अमृतमहोत्सवी सोहळ्याच्या स्वागताध्यक्षपदी प्रसिध्द लेखिका तथा कवयित्री उषाताई घायतडक यांची निवड करण्यात आली ,अशी माहिती संयोजक डी. एन. जाधव यांनी दिली. रविवार,३० मार्चला सकाळी ११ वाजता मराठवाडा साहित्य परिषदच्या डॉ. ना. गो .नांदापूरकर सभागृहात प्रसिध्द व्याख्याते तथा विचारवंत प्रा. डॉ. शिवानंद भानुसे आणि ज्येष्ठ पत्रकार स. सो. खंडाळकर यांचे "भारतीय संविधान" या विषयावर व्याख्यान होईल. प्रसिध्द साहित्यिक डॉ. ऋषीकेश कांबळे अध्यक्षस्यानी असतील.सदर सोहळ्याचे उदघाटन प्रसिध्द साहित्यिक डॉ. मिलींद रणवीर हे करतील. ज्येष्ठ प्रकाशक के.एस. अतकरे बापू आणि झेप पुरस्कार निवड समिती अध्यक्ष श्रीमती. ए. बी. साळवे यांची प्रमुख उपस्थिती असेल. यावेळी समता सैनिक दल पदाधिकारी यांना सन्मानपत्र बहाल करुन गौरवण्यात येणार आहे. या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन झेपच्या वतीने करण्यात आले आहे.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

**Sanitary Health Inspector**

**सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर**

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903



इरफान इनामदार

मो. 8956362639
8087880274
9405109103

E-mail : sahilcomputer05@gmail.com

**साहिल**

कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १८ मार्च २०२५


## महिला अबला आहेत की सबला - अँड. शुभदा पोतदार



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले):** महिला सबलीकरण या विषयावर चर्चा करताना आजच्या काळात खरच महिला अबला आहेत की सबला या प्रश्नावर आपण चर्चा केली पाहिजे. महिला म्हणुन जीवनाच्या प्रवासात अनंत अडचणी येतात. पण त्या अडचणीवर कशी मात करता येईल. यासाठी बौद्धिक आणि मानसिक युक्त्या महिलांनी वापरून सामोरे गेल्यास महिला अबला म्हणुन राहणार नाहीत. त्या सक्षम आणि सबला महिला असतील. म्हणुन केवळ ८ मार्चला जागतिक महिला दिन साजरा केले की महिला सबला होतील असे नाही. त्यासाठी महिलांनी सजग राहून स्वतः बरोबर इतराना मदत करावी त्यामुळे अबला महिला हे वाक्य कायमचे नष्ट होईल असे प्रतिपादन अँड. शुभदा पोतदार यानी केले. येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय वाणिज्य विभागातील वाणिज्य मंडळाच्या महिला सबलीकरण मुलीच्या कक्षा अंतर्गत जागतिक महिला दिन सप्ताह समारोपात "मुलींची महिला सबलीकरणसाठी भूमिका" या विषयावर चर्चा सत्र संपन्न झाले.यावेळी अँड पोतदार यानी विद्यार्थिनींना कसे वागावे, आणि आपल्या संरक्षण साठी असलेले विविध कायदे यावर सविस्तर मार्गदर्शन केले. या चर्चासत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ संजय अस्वले यानी आपल्या अध्यक्षीय समारोपात विद्यार्थिनींनी एक चांगली मुलगी, बहीण, सून,अत्या, आई, सासू बनण्यासाठी बौद्धिक आणि मानसिक परिपक्वता प्राप्त करावी. यासाठीच महाविद्यालयात आयोजित अशा कार्यक्रमाची गरज आहे. विद्यार्थिनींनी याचा लाभ घ्यावा असे प्रतिपादन केले.

यावेळी योगिता इंगळे, विशाखा शेळके या विद्यार्थिनींनी आपली मनोगते मांडली. त्यानंतर खुल्या चर्चा सत्रात हुंडा, अत्याचार, न्यायालयीन विलंब, राजकीय हस्तक्षेप अशा अनिष्ट प्रथा आणि चालीरीती याबद्दल विद्यार्थिनींनी प्रश्न मांडले. त्याला या चर्चासत्रात मान्यवरांनी उत्तर दिले. या कार्यक्रमात सई भोसले या विद्यार्थिनीने दांड पट्टा आणि तलवार बाजी चे सादरीकरण केले. यावेळी डॉ अजित अष्टे, विजयकुमार मुळे, खंडू मुरलीकर , ओमप्रकाश पवार, अक्षता बिरादार, राणी बेंबळगे, यांची उपस्थिती होती या कार्यक्रमाचे सूत्र संचालन अनिता मोरे, प्रास्ताविक श्रेजल पाटील आणि आभार मंजुषा बिराजदार यानी केले.कार्यक्रमासाठी वाणिज्य मंडळाच्या महिला सबलीकरण समितीच्या सदस्यांनी पुढाकार घेतला.

## छात्र भारतीचे विद्यार्थी संघटनेच्या कार्यकर्त्यांना मारहाण; संगमनेर मध्ये निषेध मोर्चा!



**अहमदनगर (महेश मुंढे) :** जिल्ह्यामधील संगमनेर येथे छात्र भारतीचे विद्यार्थी संघटनेचे राज्याचे कार्याध्यक्ष अनिकेत दादा घुले यांना झालेल्या मारहाणीच्या निषेधार्थ संगमनेर प्रांत कार्यालयावर निघालेल्या मोर्च्याला वंचित बहुजन आघाडीच्यावतीने पाठिंबा जाहीर केला. मंत्री नितेश राणे यांच्या विरोधात निवेदन देण्यास गेलेल्या कार्यकर्त्यांवर पालकमंत्री मा. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या समोर, त्यांच्याच कार्यकर्त्यांनी पोलीस प्रशासनाच्या उपस्थितीत मारहाण केली. राज्यभरात ठिकठिकाणी वाढत असलेल्या हिंसाचाराच्या घटना, लोकशाही पद्धतीने न्याय मागत असताना होणारी मुस्कटदाबी, नेत्यांची - मंत्र्यांची बेभान वक्तव्य, समाजांमध्ये तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न या सगळ्या विरोधात जनमानसात प्रचंड चीड आहे, अशी भूमिका वंचित बहुजन आघाडीच्या राज्य प्रवक्त्या उत्कर्षाताई रुपवते यांनी यावेळी मांडली.

यावेळी डीवायएसपी सोनवणे यांना निवेदन देऊन आरोपींवर सक्त कार्यवाही व्हावी यासाठी आग्रह धरला. निषेध सभेसाठी माजी आमदार कपिल पाटील, मा.आ. डॉ. सुधीर तांबे, सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित शिंदे, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचे राज्य सचिव डॉ.अजित नवले, सेवा दलाचे राज्याचे अध्यक्ष राजाभाऊ कांदळकर, छात्र भारतीचे राज्याचे अध्यक्ष रोहित ढाले, राजाभाऊ अवसक, एड. रंजनाताई गवांदे, सिताराम राऊत, डॉ. सागर भालेराव, दत्ता ढगे, रजत अवसक, विद्यार्थी सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड शिक्षक आत्महत्या प्रकरणी संस्थाचालकावर गुन्हा दाखल होणार गृह राज्यमंत्र्यांचे आश्वासन

**मुंबई :** विधिमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्याच्या पहिल्याच दिवशी बीड येथील शिक्षकाच्या आत्महत्येचा मुद्दा सभागृहात गाजला. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बीडमधील शिक्षकाच्या आत्महत्याप्रकरणावरुन सरकारला सवाल उपस्थित केले. तसेच संबंधित संस्थाचालकांवर गुन्हा का दाखल झाला नाही, असा जाब विचारला. ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनीही हा मुद्दा उपस्थित करत संस्थाचालकांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. यावर सखोल चौकशी करुन गुन्हा दाखल होईल, असं उत्तर गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिले.

केज तालुक्यातील केळगाव येथील आश्रमशाळेवर १८ वर्षांपासून विनावेतन नोकरी करणाऱ्या शिक्षकाने शनिवारी पहाटे बीड शहरातील स्वराज्यनगर भागात शिक्षण संस्थाचालकाच्या पतसंस्थेसमोर गळफास घेत आत्महत्या केली. त्यांनी आत्महत्येपूर्वी फेसबुकवर अनेक पोस्ट केल्या. शेवटच्या पोस्टमध्ये त्यांनी संस्थाचालकांवर छळाचे आरोप करत त्यांच्यामुळे आत्महत्या करत असल्याचे म्हटले. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली होती. आज विधान परिषदेत याच मुद्द्यावरून विरोधकांनी सरकारला घेरले.

अंबादास दानवे यांनी संस्थाचालकांवर गुन्हा का दाखल झाला नाही असा जाब सरकारला विचारला तर ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनीही हा मुद्दा उपस्थित करत, तात्काळ संस्थाचालकावर गुन्हा दाखल करा, अशी मागणी सभागृहात केली. त्यानंतर, याप्रकरणी सखोल चौकशी करून गुन्हा दाखल होईल, असे उत्तर राज्याचे गृह (ग्रामीण) राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत दिले.

शिक्षक धनंजय नागरगोजे हे केज तालुक्यातील केळगाव येथील आश्रमशाळेवर कार्यरत होते. परंतु, मागील १८ वर्षांपासून त्यांना वेतन मिळाले नाही. अखेर त्यांनी हताश होऊन कृष्णा अर्बन को-ऑपरेटिव बँक लिमिटेडच्या केज शाखेजवळ आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी फेसबुकवर पोस्ट केली होती. यामध्ये त्यांनी विक्रम बाबूराव मुंडे, विजय विक्रम मुंडे, अतुल विक्रम मुंडे आणि त्यांचे कार्यकर्ते उमेश रमेश मुंडे, गोविंद नवनाथ आव्हाड, ज्ञानेश्वर राजेभाऊ मुरकुटे यांची नावे घेतली. माझ्या मृत्यूला हेच लोक जबाबदार असल्याचेही त्यांनी म्हटले. धनंजय नागरगोजे यांनी आपल्या मुलीची माफी मागितली. श्रावणी बाळा तुझ्या बापूला शक्य झालं तर माफ कर, मी माफी मागायच्या लायकीचा नाही. तुला अजून कळत नाही तुझे वय किती आहे. ज्याला कळायला पाहिजे होते त्याला तुझा बापू कळाला नाही अशा आशयाची ही भावनिक पोस्ट होती.

दरम्यान, धनंजय नागरगोजे ज्या शाळेत शिक्षक म्हणून काम करत होते त्या केळगाव येथील आश्रम शाळेच्या संस्थाचालकांची प्रतिक्रिया समोर आली आहे. धनंजय नागरगोजे यांच्या आत्महत्येसाठी सरकार जबाबदार असल्याचा दावा या संस्थाचालकांनी केला आहे. धनंजय नागरगोजे यांची संस्थेने २००६ साली सहशिक्षक म्हणून नियुक्ती आदेश देऊन नियुक्ती केली होती. त्यानंतर २०१० मध्ये शासनाने त्यांना कायम करण्याचा अध्यादेश काढला तेव्हा त्यांच्यासह इतर शिक्षक आणि कर्मचारी यांनाही सेवेत कायम करण्यात आले होते. तसेच शासनानेही त्याला मान्यता दिली होती. शासनाने २०१९ मध्ये निर्णय घेत शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना २० टक्के अनुदान देऊ केले होते. मागच्या दोन चार वर्षांपासून हे अनुदान मिळेल असे वाटत होते. मात्र सरकारकडून हे अनुदान मिळाले नाही. हे अनुदान न मिळाल्याने हा प्रकार घडला आहे, असा दावा संस्थाचालकांनी केला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १८ मार्च २०२५


# प्रा. सुधाकर कुलकर्णी यांच्या अमृत महोत्सवाप्रसंगी राजकीय विचार मंथन गौरव ग्रंथाचे प्रकाशन




**लातूर (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील एमसीव्हीसी सभागृहात आयोजित रविवारी (ता. १६) रोजी प्रा. सुधाकर कुलकर्णी अमृत महोत्सव सोहळा पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर हे होते. यावेळी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता प्राचार्य डॉ. व्ही. एन. इंगोले, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा उपकेंद्राचे संचालक डॉ. राजेश शिंदे, प्राचार्य डॉ. कुसुमताई पवार-मोरे, लातूरचे माजी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. गंगाधर हिंगोले, विद्यापीठ व्यवस्थापन समितीचे सदस्य प्रा. डॉ. डी. एन. मोरे, बसवेश्वर संस्थेचे संचालक सुनिल मिटकरी, प्रदिप दिंडेगावे, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई, सामाजिक कार्यकर्त्या प्रा. डॉ. सुषमा अंधारे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी दयानंद कला महाविद्यालयाची बी. ए. द्वितीय (संगीत) वर्षाची कुमारी मनश्री महेश मोटे हिने स्वागतम सुस्वागतम हा मानाचा मुजरा हे गीत सादर केले. सत्कारमूर्ती प्रा. सुधाकर कुलकर्णी यांच्या मानपत्राचे वाचन प्राचार्य डॉ. संग्राम मोरे यांनी केले. संयोजन समितीच्या वतीने प्रा. सुधाकर कुलकर्णी यांचा सपत्नीक पूर्ण आहेर, मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, पुष्पहार घालून मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी राजकीय विचार मंथन गौरव ग्रंथाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. संयोजन समितीचे प्रमुख प्रा. डॉ. महेश मोटे, सदस्य प्राचार्य डॉ. नरसिंग येचाळे, डॉ. संजय मोरे, प्रा. डॉ. श्रीराम भालेराव, प्रा. डॉ. जगदीश देशमुख, प्रा. डॉ. सदाशिव दंदे, प्रा. डॉ. यशवंत वळवी, प्रा. कल्याण कांबळे, विनायक बोरीकर, प्रा. डॉ. हरिश्चंद्र चौधरी, प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, प्रा. डॉ. रत्नाकर बेडदे, डॉ. गणपत कारिकंटे, इस्माईल शेख आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वागताध्यक्ष माजी खा. डॉ. सुनिल गायकवाड यांनी केले. संयोजन समितीचे प्रमुख प्रा. डॉ. महेश मोटे यांनी या आयोजनाबाबतची भूमिका स्पष्ट केली. मनोगत प्राचार्य डॉ. व्ही. एन. इंगोले, प्राचार्य डॉ. कुसुम पवार, डॉ. राजेश शिंदे, प्रा. गंगाधर हिंगोले, प्राचार्य डॉ. संजय गवई, इंदुमती कुलकर्णी, डॉ. अमित कुलकर्णी, प्रा. सुषमा अंधारे, प्रा. कल्याण कांबळे, डॉ. संजय मोरे, प्रा. डॉ. राजेंद्र इंगळे आदींनी व्यक्त केले. यावेळी ऑनलाइन चित्रफितीद्वारे उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी राज्यशास्त्र विषयाची प्रासंगिकता, राजकीय प्रक्रिया, बदलते राजकीय प्रवाह याविषयी मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थ्यांनी एकत्रित येऊन राजकीय विचार मंथन या गौरव ग्रंथाची निर्मिती केली, हे निश्चितच वाचकांसाठी प्रेरणादायी ठरेल. आपल्या गुरुप्रती असणारी कृतज्ञता माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त करणे, ही बाब कौतुकास्पद असल्याचे ते म्हणाले.

डॉ. व्ही. एन. इंगोले म्हणाले की, राज्यशास्त्राचे अध्ययन करणे म्हणजे आदर्श नीतिमान नागरिक बनविण्याची प्रक्रिया होय. आज लोकशाहीच्या राजकीय मूल्यांकडे दुर्लक्ष होत असताना सरांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले त्यांचे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात गुरूंच्या विचारांची परंपरा जोपासून त्यांनी त्यांच्याप्रती कृतज्ञताभाव ठेवून अशा सोहळ्याचे आयोजन करतात हीच त्यांच्या कार्याची उपलब्धी आहे.

प्रा. सुषमा अंधारे म्हणाल्या की, प्रा. कुलकर्णी सरांनी वर्गात आम्हाला जी राजकारणाबाबत वैचारिक मूल्ये शिकवली. ती मूल्ये सध्याच्या राजकारणात हरवत चाललेली आहेत. लोकशाही अधिक सक्षम होण्याच्या दृष्टीने नवीन पिढी अधिक सक्रिय झाली पाहिजे. लोकशाहीच्या संवर्धनासाठी राजकीय मूल्ये, राजकीय सिद्धांताचे जतन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच ठरत आहे, असे मूल्याधिष्ठित राजकारण करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना प्रा. सुधाकर कुलकर्णी म्हणाले, आज हा क्षण माझ्यासाठी अतिशय भावनिक आणि आनंदाचा आहे. ७५ वर्षांचा हा प्रवास माझ्यासाठी केवळ ज्ञानदानाचा नव्हता, तर हा एक उत्तम अनुभवाचा होता, जिथे मी विद्यार्थ्यांबरोबर शिकतही गेलो. मी ज्या शिक्षण संस्थेमध्ये अध्यापन कार्यास सुरुवात केली. ती संस्था महात्मा बसवेश्वरांच्या नावाने चालते आहे. त्यांच्या विचाराची परंपरा मी पुढे नेण्याचा केवळ प्रयत्न केला आहे. राज्यशास्त्र हा विषय केवळ पुस्तकांपुरता मर्यादित नव्हता, तर तो आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. आज जेव्हा माझे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रांत आपली चमक दाखवतात, तेव्हा माझ्या कार्याची खरी पोचपावती मला मिळते. जेव्हा विद्यार्थी यशस्वी होऊन आपल्या शिक्षकांचा सन्मान करतात. माझ्या अध्यापन प्रवासात अनेक आव्हाने आली, पण विद्यार्थ्यांच्या डोळ्यातील कुतूहल आणि शिकण्याची जिद्द हीच माझ्यासाठी नेहमी प्रेरणादायक ठरली.सत्कार हा केवळ व्यक्तीचा नसतो, तर तो त्या विचारांचा असतो. जे शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या संबंधाचा असतो. शिक्षण ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. ज्ञान मिळवण्याची आणि देण्याची प्रक्रिया कधीही थांबत नाही. म्हणूनच, नवीन विचार आत्मसात करा, समाजासाठी योगदान द्या आणि उत्तम नागरिक बना असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला.

अध्यक्षीय समारोपप्रसंगी माधवराव टाकळीकर म्हणाले, की, गुरु शिष्याची ही परंपरा निश्चितच पुढील पिढीसाठी आदर्शवत आहे. याप्रसंगी जो गौरव ग्रंथ काढला तोही वाचकांना प्रेरणादायी ठरेल. माजी विद्यार्थ्यांचा हा सोहळा म्हणजे लातूरच्या शैक्षणिक क्षेत्रातील नवीन पॅटर्नची सुरुवात आहे. आमच्या संस्थेने जे मूल्याधिष्ठित शैक्षणिक कार्य केले, त्याचीच कृतज्ञता म्हणजे आजचा सोहळा आहे. हीच परंपरा पुढेही ठेवण्याचा आमचा मानस असल्याचे त्यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रविण गिरी तर आभार प्रा. डॉ. रत्नाकर लक्षटे यांनी मानले. यावेळी महाराष्ट्रातून विविध क्षेत्रातील प्राध्यापक, शिक्षक, मित्रपरिवार, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १८ मार्च २०२५

# शैक्षणिक व सामाजिक स्थित्यंतरातील समस्यांचे संवेदन आक्रोश: विद्रोही कवी साहेबराव मोरे




'आक्रोश 'हा लघुकथा संग्रह नुकताच वाचनात आला पंढरी बनसोडे यांनी लातूरच्या साहित्यक्षेत्रात नोंद घेण्याजोगी साहित्यनिर्मिती केली आहे सामाजिक दंभावर कोरडे ओढून त्यांच्या विरोधात जागृती निर्माण व्हावी यासाठी ते सातत्याने लेखन करीत असतात अनादी काळापासून कथा हा साहित्य प्रकार,करमणूकीसाठी, प्रबोधनासाठी मौखिक न् लिखित स्वरूपात वापरात आलेला आहे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवतावादी मूल्यांचे बोट धरून समाजातील सामान्य माणसाच्या व्यथा वेदनांवर प्रहार करणारे कथा बीज , ह्या अर्थाने आक्रोश ची दखल घेणे क्रमप्राप्त ठरते . 'आक्रोश' च्या केंद्र स्थानी गावकुसा बाहेरचा,उपेक्षित पिडित, बहिष्कृत गांजलेला माणूस आहे, तोही सर्वहारा समाजाचे प्रतिनिधित्व करणारा!१४ लघुकथा संग्रहात आहेत. डॉक्टर होण्याचं स्वप्न उराशी बाळगून १२ वीत अव्वल स्थान पटकावणारा किसन तापानं मृत्यूमुखी पडतो हा दुखा:चा आक्रोश काळीज भेदणारा आहे शीर्षक स्थानी असलेली कथा अल्पशब्द,अ पाल्हाळता व कथानकाच्या अनुषंगाने उजवी ठरली आहे .अनाथाश्रमात पोरकेपण पाचवीला पूजलेला राजू अपघाती बेशुद्ध पडल्या आरतीला परोपकारी भावनेतून इस्पितळात दाखल करतो, काळजी घेतो नंतर ते जीवनसाथी होतात एका अनाथाला स्नेहाचं आपलं हक्काचं कुटुंब मिळत.'पोरका'ही भावस्पर्शी कथा वाचताना वाचक समरस होऊन जातो .शहरात पोट भरण्यासाठी गेलेला उमेश गावाकडे जाण्याचा निर्णय घेतो "' शहरात कायबीं खर नाय, कोण कुणाला बघत नाय अन् विचारत नाय"ही अक्काची खंत माणूसकी आटलेलं शहरीकरण अधोरेखित करते.' तासिका' कथेतील तासिका तत्त्वावर नेमणूक करण्यात आलेल्या प्राध्यापकाची शोषणीय, वास्तविक कहाणी शासनाच्या असंवेदनशील वृत्तीची द्योतक आहे, नोकरी टिकविण्यासाठी खेडोपाडी प्रवेश करण्यासाठी भटकंती करावी लागते, रात्री बारवेटर व्हावं लागतं ही सल शैक्षणिक धोरणाचा बुरखा टराटरा फाडणारी आहे. विनाअनुदान गोंडस नावाने राजकीय पुढाऱ्यांना भ्रष्टाचाराचे कुरण उपलब्ध करून देणाऱ्या शिक्षण मंत्रालयाचे वाभाडे काढणारी 'अनुदान' कथावास्तवदर्शी असून पोटापाण्यासाठी भाजी विकणारा प्राध्यापकांच जळजळीत सत्य वाचताना वाचक मन पेटून उठते, अनेक शिक्षक व प्राध्यापक वर्गाने २०/२५ वर्ष फुकट सेवा दिली व शेवटी जीवन संपविले.'पर्मनंट' कथा संस्था चालक व राजकीय नेत्यांच्या साटंलोटं, जांगडगुत्याची चीड निर्माण करणारी आहे उच्च विद्याविभूषित तुकाराम सुगावेंचा ऐन पर्मनंट होतेवेळी आमदार साहेबांच्या नातेवाइकाच्या घुसखोरीने पत्ता कट होतो,तोही कायमचा! ही दाहकता लेखकाने अनुभवली आहे आहे .ती नोकरी गेली हाती धुपाटणे आले. पुढार्यांची युज अँन्ड थ्रो वृत्ती कैक सामान्य लोकांच्या घरादारावर वरवंटा फिरवते.जी डिग्री भाकरी देत नाही असे कुचकामी शिक्षण काय कामाचे? असा टोकदार प्रश्न लेखक पोटतिडकीने समाजाला विचारतो तेव्हा पंढरी बनसोडे यांच्या धाडसाला दाद द्यावी लागते. 'सूड 'कथेत अन्यायाविरुद्ध चंडिकेचे रुद्र रूप धारण करणारी रखमां, भूतांच्या काल्पनिक भितीमुळे अंधश्रद्धेची बळी ठरलेली तुळसां, दुष्काळाचा फायदा घेऊन सावकार १००रूयात चार तास लाकडं फोडून बाहेर हाकलतो ही गरीबीची "परवड "ताकदीने उभी करण्यात बनसोडे यशस्वी झाले आहेत .'जयंती' ही दखलपात्र कथा आहे.जात्यांध सामाजिक संरचनेत आजही मनुवादी विचारसरणी वरचढ ठरते आहे,

डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणूक सरपंच अधिकार व बळाचा वापर करून उधळून लावतो दलितांना अमानुष मारहाण केली जाते हे विदारक वास्तव अंकीत करतांनाच बनसोडे प्रस्थापित धर्ममार्तंड विरोधात द्रोह करतात,या अनुषंगाने आंबेडकरी जाणीवांचे दलित कथा प्रांतातले हे पुढचे प्रोग्रेसिव्ह स्थित्यंतर म्हणावे लागेल. कर्तव्य,व्यसन, रंग, आधार, आदी कथा सामाजिक मनोव्यापारातून निर्माण झालेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यार्या आहेत मनाच्या आंतरिक व्यवहाराला अनूकुल बोलीभाषेतील माफक वापर, त्यातील प्रवाही पणा वाचकांना प्रेरित करतो, एकूणात सर्वच कथा शैक्षणिक व सामाजिक समस्यांचे प्रतिबिंब घडविणारर्या आहेत हे मनोरंजन, स्मृतिरंजन किंवा भावविवशतेतून केलेले लिखाण नसून सामाजिक आत्मभान जागृत ठेवून सामाजिक वैचारिक कुरूपतेवर तटस्थपणे बेतलेले वास्तव चित्रण आहे 'आक्रोश' ची आशयवृद्धी करणारी वैशाली मून यांची प्रस्तावना लक्षवेधी ठरली आहे.राहुल मुंढे यांचे ग्राफिक्स मुखपृष्ठ प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धचा हुंकार व्यक्त करते .मुद्रण व मांडणी विषयी प्रकाशक सजग राहिले असते तर पुस्तक अधिक प्रभावी वाचनीय झाले असते .विरामचिन्हांचा अतिरेक अर्थभेदास कारण ठरतो , काव्यपंक्ती सद्दश टाइप सेंटीग याकडे दुर्लक्ष करता येणार नाही . तथापि साहित्य मूल्य व सामाजिक दायित्वाचे भान राखलेल्या कथा संग्रहाचे वाचक रसिक व अभ्यासक नक्कीच स्वागत करतील अशी आशा बाळगतो. प्रा. पंढरी बनसोडे यांच्या दमदार साहित्यिक वाटचालीसाठी मंगलमय शुभेच्छा व्यक्त करतो

**समीक्षण**
**विद्रोही कवी साहेबराव मोरे,**
**शब्दसंवाद :**
**९४०४०४८६०१**
**आक्रोश: कथासंग्रह**
**लेखक : प्रा. पंढरी बनसोडे**
**प्रकाशन: श्री साई प्रकाशन**
**मूल्य:१५०₹**

# रेल्वेत चोरी गेलेले साडेदहा लाखांचे दागिने प्रवाशाला पोलिसांमुळे मिळाले परत



**पुणे :** रेल्वे प्रवास दरम्यान एका ज्येष्ठ नागरिकाच्या बॅगेतून साडेअकरा लाख रुपयांचे दागिने चोरून पसार झालेल्या चोरट्याला लोहमार्ग पोलिसांनी गजाआड केले.संबंधित चोरट्याकडून दहा लाख ९३ हजारांचे दागिने जप्त करुन तक्रारदार ज्येष्ठ नागरिकाला परत करण्यात आल्याने ज्येष्ठ प्रवासीला दिलासा मिळाला आहे.

सुमीतकुमार सतवरसिंह (वय ३०, रा. सुलतानपुरी, दिल्ली, मूळ रा. भवानी खेडा, हरयाणा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत शिरीष विठ्ठलराव शितोळे (वय ७३, रा. आनंदपूरा, देवास, मध्य प्रदेश) यांनी लोहमार्ग पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात फिर्याद दिली होती. १३ जानेवारी रोजी शितोळे इंदूर-पुणे रेल्वेगाडीतून प्रवास करत होते. पुणे रेल्वे स्थानकावर शितोळे दाम्पत्य उतरल्यानंतर त्यांच्या बॅगेतून साडेअकरा लाख रुपयांचे सोन्याचे दागिने कोणीतरी चोरुन नेल्याचे उघडकीस आले. दागिने चोरीला गेल्यानंतर शितोळे यांनी पुणे रेल्वे स्थानक लोहमार्ग पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात फिर्याद दिली होती. त्यानंतर लोहमार्ग पोलिसांनी तपास सुरू करत, पुणे रेल्वे स्थानकासह १५० ठिकाणचे सीसीटीव्ही चित्रीकरण पोलिसांनी ताब्यात घेतले व त्याची बारकाईने तपासणी केली. घोरपडी रेल्वे यार्ड परिसरात संशयित चोरटा सुमीतकुमार थांबल्याची माहिती तपास पथकाला मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्याला पकडले. त्याच्याकडून १० लाख ८३ हजारांचे दागिने जप्त करण्यात आले. न्यायालयीन प्रक्रिया पार पाडून शितोळे यांना नुकतेच दागिने परत करण्यात आले. लोहमार्ग पोलीस अधीक्षक तुषार दोशी, अतिरिक्त अधीक्षक रोहिदास पवार, उपविभागीय अधिकारी बिपीन हसबनीस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद खोपीकर, उपनिरीक्षक यशवंत साळुंके, कदम, दांगट, टेके, बिडकर, केंद्रे, वाघमारे यांनी ही कारवाई केली.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
■ प्रोजेक्ट रिपोर्ट ■ डेझर्टेशन
■ पीएच.डी./एम.फिल.थेसिस ■ कलर प्रिंट
■ डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट ■ स्कॅनिंग
■ स्पायरल व हार्ड बायडींग ■ लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशनचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १८ मार्च २०२५

# प्रकाशक महिलांच्या यशोगाथा प्रेरणादायी : प्रा. डॉ. भास्कर ढोके




प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार यांच्या ' गुटेनबर्गच्या सावल्या ' या पुस्तकाचे प्रकाशन करताना प्राचार्य डॉ. विलास देशमुख, प्रा. डॉ. भास्कर ढोके, श्री. सागर वैद्य आणि सुरेखा बोऱ्हाडे

**नाशिक :** ग्रंथ लेखन, ग्रंथ निर्मिती आणि एकुणच ग्रंथ व्यवहारात पुरुषांचे प्राबल्य व वर्चस्व दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून साहित्यिक म्हणून भारतातील सर्व भाषक स्त्री लेखिका, कवयत्रींनी बहुमोल योगदान दिलेले असले तरी प्रकाशक म्हणून स्त्रिया अलीकडेच्या दशकांमध्ये या क्षेत्रात आल्या आहेत. भारतीय प्रकाशन विश्वात स्त्रियांचं आगमन उशीरा झालं असले तरी त्यांनी अतिशय उल्लेखनीय असे काम केले आहे आणि करीत आहेत. अशा कर्तुत्ववान महिला प्रकाशकांच्या यशोगाथा प्रा. डॉ . प्रवीण घोडेस्वार यांनी आपल्या ' गुटेनबर्गच्या सावल्या ' या पुस्तकातून शब्दबद्ध केल्या आहेत. स्त्री चळवळीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात हा ग्रंथ प्रसिध्द होणे, ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे, असे प्रतिपादन मराठा विद्याप्रसारक समाजाचे शिक्षण अधिकारी आणि समीक्षक प्रा. डॉ. भास्कर ढोके यांनी केले. संस्थेच्या समाजकार्य महाविद्यालयात प्रा. डॉ. घोडेस्वार यांच्या पुस्तक प्रकाशनाचा सोहळा संपन्न झाला.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास देशमुख, पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य सागर वैद्य आणि कवयत्री सुरेखा बोऱ्हाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी बोलताना डॉ. देशमुख म्हणाले की, विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच अवांतर वाचन करण्याची गरज आहे. वाचनाने व्यक्तिमत्त्व समृद्ध होते. या पुस्तकातून अनेक महिला प्रकाशकांचे कार्य वाचकांसमोर आणणे, ही महत्वपूर्ण बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले.प्रकाशक महिलांच्या यशोगाथा प्रेरणादायी : प्रा. डॉ. भास्कर ढोके नाशिक: ग्रंथ लेखन, ग्रंथ निर्मिती आणि एकुणच ग्रंथ व्यवहारात पुरुषांचे प्राबल्य व वर्चस्व दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून साहित्यिक म्हणून भारतातील सर्व भाषक स्त्री लेखिका, कवयत्रींनी बहुमोल योगदान दिलेले असले तरी प्रकाशक म्हणून स्त्रिया अलीकडेच्या दशकांमध्ये या क्षेत्रात आल्या आहेत. भारतीय प्रकाशन विश्वात स्त्रियांचं आगमन उशीरा झालं असले तरी त्यांनी अतिशय उल्लेखनीय असे काम केले आहे आणि करीत आहेत. अशा कर्तुत्ववान महिला प्रकाशकांच्या यशोगाथा प्रा. डॉ . प्रवीण घोडेस्वार यांनी आपल्या ' गुटेनबर्गच्या सावल्या ' या पुस्तकातून शब्दबद्ध केल्या आहेत. स्त्री चळवळीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात हा ग्रंथ प्रसिध्द होणे, ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे, असे प्रतिपादन मराठा विद्याप्रसारक समाजाचे शिक्षण अधिकारी आणि समीक्षक प्रा. डॉ. भास्कर ढोके यांनी केले. संस्थेच्या समाजकार्य महाविद्यालयात प्रा. डॉ. घोडेस्वार यांच्या पुस्तक प्रकाशनाचा सोहळा संपन्न झाला.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास देशमुख, पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य सागर वैद्य आणि कवयत्री सुरेखा बोऱ्हाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी बोलताना डॉ. देशमुख म्हणाले की, विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच अवांतर वाचन करण्याची गरज आहे. वाचनाने व्यक्तिमत्त्व समृद्ध होते. या पुस्तकातून अनेक महिला प्रकाशकांचे कार्य वाचकांसमोर आणणे, ही महत्वपूर्ण बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले.प्रकाशक महिलांच्या यशोगाथा प्रेरणादायी : प्रा. डॉ. भास्कर ढोके नाशिक: ग्रंथ लेखन, ग्रंथ निर्मिती आणि एकुणच ग्रंथ व्यवहारात पुरुषांचे प्राबल्य व वर्चस्व दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून साहित्यिक म्हणून भारतातील सर्व भाषक स्त्री लेखिका, कवयत्रींनी बहुमोल योगदान दिलेले असले तरी प्रकाशक म्हणून स्त्रिया अलीकडेच्या दशकांमध्ये या क्षेत्रात आल्या आहेत. भारतीय प्रकाशन विश्वात स्त्रियांचं आगमन उशीरा झालं असले तरी त्यांनी अतिशय उल्लेखनीय असे काम केले आहे आणि करीत आहेत. अशा कर्तुत्ववान महिला प्रकाशकांच्या यशोगाथा प्रा. डॉ . प्रवीण घोडेस्वार यांनी आपल्या ' गुटेनबर्गच्या सावल्या ' या पुस्तकातून शब्दबद्ध केल्या आहेत. स्त्री चळवळीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात हा ग्रंथ प्रसिध्द होणे, ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे, असे प्रतिपादन मराठा विद्याप्रसारक समाजाचे शिक्षण अधिकारी आणि समीक्षक प्रा. डॉ. भास्कर ढोके यांनी केले. संस्थेच्या समाजकार्य महाविद्यालयात प्रा. डॉ. घोडेस्वार यांच्या पुस्तक प्रकाशनाचा सोहळा संपन्न झाला.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास देशमुख, पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य सागर वैद्य आणि कवयत्री सुरेखा बोऱ्हाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी बोलताना डॉ. देशमुख म्हणाले की, विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच अवांतर वाचन करण्याची गरज आहे. वाचनाने व्यक्तिमत्त्व समृद्ध होते.

या पुस्तकातून अनेक महिला प्रकाशकांचे कार्य वाचकांसमोर आणणे, ही महत्वपूर्ण बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले.सागर वैद्य यांनी भारतातील मुद्रण कलेचा विकासाबाबत तसेच दैनंदिन वृत्तपत्रांच्या छपाईबाबतपत्रकारितेतला स्वतःचे विविध अनुभव सांगितले. या पुस्तकातून चितारलेल्या भारतातील आणि राज्यातील महिला प्रकाशकांच्या यशस्वी कहाण्या स्त्री सक्षमीकरणाचे प्रतीक असल्याचे मत वैद्य यांनी व्यक्त केले.मुद्रण व्यवसायात स्त्रियांना येणाऱ्या अनेक समस्या व अडचणींवर मात करून ह्या महिला प्रकाशकांनी आपला ठसा उमटविला आहे. त्यांचे काम या क्षेत्रात येऊ पाहणाऱ्या नवीन मुली - स्त्रियांना दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरेल, असा आशावाद सुरेखा बोऱ्हाडे यांनी व्यक्त केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. मनिषा शुक्ल यांनी केले. प्रा. डॉ. सोनल बैरागी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.तर आभार प्रदर्शन डॉ. प्रतिमा पवार यांनी केले. श्री . नारायण गबाले, शुभम भालेराव, दीपक जाधव, प्रसाद भोर यांनी कार्यक्रमाचे तांत्रिक संयोजन केले. पियुषा सुरवाडे यांनी कार्यक्रमाचे अहवाल लेखन केले.कार्यक्रमाला मोठ्या संख्येने समाजकार्याचे विद्यार्थी आणि प्राध्यापकवृंद उपस्थित होते.

# मिलिंद सूर उत्सव-२०२५ व मा. ना. संजयजी शिरसाट यांचा विशेष सत्कार संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** मिलिंद महाविद्यालयाचे अमृत महोत्सवी वर्ष २०२४-२०२५ साजरे होत आहे. या अमृत महोत्सवी वर्षात महाविद्यालयात विविध उपक्रम राबविण्यात आलेले आहेत. या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मिलिंद कला महाविद्यालयाच्या वतीने बुध्द-फुले-आंबेडकरी प्रबोधन गीतांचा 'मिलिंद सूर उत्सव-२०२५' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.मिलिंद कला महाविद्यालयाच्या वतीने आयोजित बुध्द-फुले- आंबेडकरी प्रबोधन गीतांचा 'मिलिंद सूर उत्सव-२०२५' मिलिंद महाविद्यालय प्रांगणात शनिवार, दि. १५ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता संपन्न झाला. यावेळी पीपल्स् एज्युकेशन सोसायटी चे माजी विद्यार्थी मा. ना. संजयजी शिरसाट साहेब यांची महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.सत्काराला उत्तर देतांना मा.ना. संजयजी शिरसाट साहेब यांनी नागसेनवन परीसराच्या विकास कामासाठी मी कायम कटीबध्द आहे. यावेळी त्यांच्या हस्ते महाविद्यालयात लवकरच संपन्न होणाऱ्या मिलिंद मॅरेथॉन-२०२५ च्या QR कोड चे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वैशाली प्रधान होत्या, त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मिलिंदच्या गौरवशाली परंपरेचा उल्लेख करुन 'मिलिंद सूर उत्सव -२०२५' कार्यक्रमाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी सर्व कलाकार व उपस्थितांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमात महाराष्ट्रातील नामवंत गायक चेतनकुमार चोपडे, अजय देहाडे, कुणाल वराळे, सचिन भुईगळ, अक्षय जाधव व विजय पवार आदींनी यावेळी बुध्द-फुले-आंबेडकरी प्रबोधनगीते सादर करुन प्रेक्षकांची मने जिंकली. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने आंबेडकरी अनुयायी, मिलिंदचे आजी-माजी विद्यार्थी व शहरातील नागरिक, पत्रकारबंधु उपस्थित होते.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002